# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सोसायटी पदाधिकाऱ्यांना पावसाळा पूर्व आपल्या परिसरातील धोकादायक झाडांची माहिती उपलब्ध करून देण्याचे आवाहन**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व को-ऑपरेटिव्ह सोसायटी यांना आपल्या परिसरातील धोकादायक झाडे याबाबत माहिती महापालिकेस देण्याकरिता मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत दरवर्षी पावसाळ्यापूर्वी शहरातील फुटपाथ, रस्त्यालगत, असलेल्या धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येते. पावसाळ्या दरम्यान शहरात कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडू नये यासाठी काळजीपूर्वक ही सर्व कामे केली जातात. त्याचबरोबर अतिवृष्टी किंवा वादळ परिस्थिती निर्माण झाल्यास वेळेत धोकादायक झाडांवर कारवाई न केल्यास दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर महापालिका कार्यक्षेत्रातील सोसायटी पदाधिकाऱ्यांनी आपल्या सोसायटीच्या परिसरातील धोकादायक झाडे, धोकादायक फांद्या काढणेकामी महापालिकेकडे अर्ज करुन मनपा कर्मचारीमार्फत पाहणी करुन, परवानगी घेऊन सुयोग्य छाटणी करण्यात यावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.